57

## कंत्राटी पदभरती जाहिरात

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा रुग्णालय रायगड-अलिबाग

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत अध्यक्ष, जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद यांचे मान्यतेने जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा रुग्णालय रायगड यांचेमार्फत मंजुर पदांमधुन रिक्त असलेली पदे निव्वळ कंत्राटी तत्वावर दि.०५.११.२०२१ पर्यंतच्या कालावधीकरीता खाली नमुद केलेल्या अटी व शर्ती च्या आधीन राहून पदभरती करण्यात येणार आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | पदाचे व कार्यक्रमाचे नांव | नियुक्तीचे ठिकाण | सामाजिक आरक्षण | शैक्षणिक अर्हता व अनुभव | प्रतिमाह मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | औषधनिर्माता (RBSK) (एकुण पदसंख्या-११) | अलिबाग-२, पनवेल-२, पोलादपुर-१,उरण-२ कर्जत-१, खालापुर-१ रोहा-१, महाड-१ | अ.जा.-४, अ.ज.-१, भ.ज.ब.-१, भ.ज.ड.-१, विमाप्र-१, ई.डब्ल्यु.एस.-१ अराखीव-२ | D.Pharm/ B.Pharm with 1 year Experience | 17,000/- |
| २ | ऑडीओलॉजिस्ट (DEIC) (एकुण पदसंख्या-१) | जि.रु.अलिबाग-१ | अ.जा.-१ | Degree in Audiology with 2 years Experience | 25000/- |
| ३ | फिजिओथेरपीस्ट (DEIC, NLEP) (एकुण पदसंख्या-२) | जि.रु.अलिबाग-२ | अ.जा.-१ खुला-१ | Graduate Degree in Physiotherapy With 1 year Experience | 20000/- |

**अटी व शर्ती :-**

१) उपरोक्त पदे हि कंत्राटी स्वरुपाची असून त्यांची नियुक्ती दि.०५.११.२०२१ पर्यंत राहील.

२) मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे नियमित प्राप्त होणाऱ्या मार्गदर्शक सुचनांचा अवलंब करणेत येईल याची पात्र उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) उपरोक्त पदे ही निव्वळ कंत्राटी असून राज्य शासनाची नियमित पदे नाहीत. शासकिय सेवेत सामावुन घेणेबाबत किंवा शासनाकडे सेवा संरक्षणासाठी दावा करणेचे अधिकार नियुक्त उमेदवारास राहणार नाहीत.

४) पदभरतीची विस्तृत जाहिरात व अर्जाचा नमुना मा.जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग यांचे संकेतस्थळावर **(raigad.gov.in)**प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

५) उपरोक्त पदांसाठी फक्त दिलेल्या सामाजिक प्रवर्गातील इच्छुक पात्र उमेदवारांनी दि.२५/०३/२०२१ते दिनांक०८/०४/२०२१ या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत (शासकिय सुटट्या वगळून) संकेतस्थळावरील अर्जाच्या विहित नमुन्यासह सर्व आवश्यक कागदपत्रांसहित अर्ज लिफाप्यामध्ये सिलबंद करुन पोस्टाद्वारे किंवा व्यक्तिशः **मा.जिल्हा**

**शल्यचिकित्सक रायगड-अलिबाग, राष्ट्रीय आरोग्य अभियान, बाहयरुग्ण विभाग, दुसरा मजला रुम नं.२१३ जिल्हा रुग्णालय अलिबाग जि.रायगड पिन-४०२२०१ यांचे नांवे राष्ट्रीय आरोग्य अभियान व पदाच्या नावाचा स्पष्ट उल्लेख करुन सादर करावेत.** कोणत्याही उमेदवारांस कोणत्याही पदासाठी सादर केलेल्या अर्जावर पोहोच मिळणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. जर अर्जाचे लखोटयावर राष्ट्रीय आरोग्य अभियान व पदाच्या नावाचा स्पष्ट उल्लेख केला नसेल आणि त्यामुळे अर्ज इतर कार्यासनाकडे जाऊन उपरोक्त विहित कालावधीत प्राप्त झाला नाही, तर अर्जावर विहित कालावधीत प्राप्त नाही असा उल्लेख करणेत येईल व अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६) निवड झालेल्या उमेदवारांना राज्य आरोग्य सोसायटी कडून प्राप्त झालेल्या अटी व शर्ती रु.१००/- चे बॉंड पेपरवर करारनामा करणे बंधनकारक राहील.

७) अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची शैक्षणिक अंतिम वर्षाच्या टक्केवारीच्या ७० टक्के गुण + NHM, शासकिय संस्था, विभाग, शासन अंगिकृत संस्था यांचा अनुभव (एका वर्षासाठी ४ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण) + उच्च शैक्षणिक अर्हता (१० गुण) या तीन बाबींचे आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार करणेत येईल तसेच सदर पदांकरीता जाहिराती मध्ये नमुद केलेनुसार अनुभव आवश्यक असुन अनुभव नसल्यास सदर उमेदवारास अपात्र करणेत येईल. सदर अंतिम गुणवत्ता यादी मा.जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग यांचे संकेतस्थळावर (raigad.gov.in)प्रसिद्ध करण्यात येईल. या यादीवर उमेदवारांची हरकत असेल तर पुराव्यानिशी हरकती मागवुन घेण्यात येतील. हरकती प्राप्त झाल्यानंतर त्याची विहित नोंद घेऊन अंतिम निवड व प्रतिक्षा यादी तयार करण्यात येऊन मा.जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग यांचे संकेतस्थळावर (raigad.gov.in)प्रसिद्ध करण्यात येईल. यासाठी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी मा.जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांचे संकेतस्थळाचे अवलोकन करावे.

८) ज्या पदांकरिता कौशल्य चाचणी अनिवार्य करणेत आलेली आहे त्या पदांकरिता पात्र उमेदवारांस नियुक्ती आदेश देण्यापुर्वी त्यांची जिल्हा स्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात येईल व सदर चाचणी मध्ये उमेदवार पात्र ठरलेनंतर त्यास नियुक्ती आदेश देण्यात येतील. कौशल्य चाचणी मध्ये उमेदवार अपात्र ठरल्यास पुढील पात्र उमेदवारास कौशल्य चाचणीकरिता बोलावण्यात येईल.

९) कौशल्य चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या गुणानुक्रमे व आवश्यकतेप्रमाणे उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील. नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारांनी हजर होणेपुर्वी आपली मुळ प्रमाणपत्रे जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचेकडून तपासुण घेणे बंधनकारक राहील.

१०) मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचेकडील पत्र क्र. राआसोम/पदभरती/११६८-७९२/२० दि.२१.०५.२०२० मधील मार्गदर्शक सुचनांनुसार जाहिरातीत नमुद केलेल्या विशिष्ठ मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर गुणानुक्रमे सर्वात वर असणाऱ्या इतर कोणत्याही मागास प्रवर्गाच्या उमेदवाराची निवड करणेत येईल. मागास प्रवर्गाचा एकही उमेदवार उपलब्ध न झाल्यास खुल्या प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार तात्पुरत्या स्वरुपात निवड करणेत येईल.

११)निवड झालेल्या उमेदवारांने हजर होताना वर्तणुकीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.

१२)**वयोमर्यादा** :- रुग्णसेवेशी संबंधित (अ.क्र.१ ते ३) या पदांची वयोमर्यादा ६५ वर्षे राहील. वय वर्षे ६० नंतर प्रत्येक वर्षी जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून शारिरिक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतरच पुर्ननियुक्ती आदेश देण्यात येतील.

१३) केंद्र शासनाने संबंधित पदे नामंजूर केल्यास त्यांच्या सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येतील.

१४) उपरोक्त पदे सन २०२०-२१ चे जिल्हा कृती आराखडयानुसार मंजूर असून पदांचे संख्येमध्ये कमी अगर जास्त, तसेच पदांचे आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**१५) अर्जासोबत सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांच्या सांक्षाकित केलेल्या छायांकित प्रती :-**

- विहीत नमुन्यातील अर्ज
- शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (पदवी/पदविका सर्व सत्रांच्या गुणपत्रिका)
- शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला
- NHM, शासकिय संस्था, विभाग, शासन अंगिकृत संस्थेतील अनुभवाचा दाखला
- जातीचे प्रमाणपत्र
- संबंधित पदाकरिता तत्सम कौन्सिलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र (पर्मनंट) व नोंदणीचे नुतनीकरण
- पासपोर्ट आकाराचे २ फोटो
- उमेदवाराच्या नावांत बदल झाला असल्यास शासनाचे राजपत्र

१६) भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर पदभरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद् करणे/पदभरती प्रक्रियेमध्ये बदल करणेचे सर्व अधिकार अध्यक्ष, जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद यांचेजवळ राखुन ठेवणेत आले आहेत. याबाबत कोणालाही दावा करता येणार नाही.

**डॉ.चेतना पाटील**
सदस्य सचिव, निवड समिती
तथा
जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

22/3/2021
**डॉ.सुहास माने**
सदस्य, निवड समिती
तथा
जिल्हा शल्यचिकित्सक रायगड
अलिबाग

22/3/21
**डॉ.किरण पाटील (भा.प्र.से)**
अध्यक्ष, निवड समिती
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा परिषद अलिबाग

# National Health Mission

## District Health Society Raigad

## APPLICATION FORM

Photo

*(All fields in the forms are mandatory to be filled. An incomplete form submitted will be treated as rejected.)*

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Exact Name of Position applied for:** | | | | |
| **Name:** | | | | |
| **Father's / Husband's Name:** | | | | |
| **Date of Birth (DD/MM/YYYY):** | | **Blood Group:** | **Gender:** | |
| **Marital Status:** | Existing NHM (Yes/No) | **Nationality:** | Religion:<br>Category: | Applying for which category |

**Address / Contact Details: (Name of the District and Pin code is compulsory)**

| | |
|---|---|
| **Address (Present):**<br><br>State:<br>Pin:<br>Contact No: | **Address (Permanent): (Write Same if same as Present Address)**<br><br>State:<br>Pin:<br>Contact No: |
| **E-mail Id for Correspondence:** | **Alternate E-mail Id for Correspondence (If any):** |

| **Languages Known:** (Write "Y" / "N") | **English** | **Hindi** | **Marathi** | **Others (Please Specify below)** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**Academic / Professional Education Summary: (Starting from most recent)**

| |
|---|
| **Computer Proficiency:** |
| **Typing Marathi 30 -words per minute :** |
| **Typing English 40 words per minute :** |

| **From** (DD/MM/YY) | **To** (DD/MM/YY) | **Degree / Diploma / Certificate Course** | **Full time/Part time** | **University/ Institute** | **Specialization / Subjects** | **Final Year total Marks** | **Final Year Obtained Marks** | **Percentage %** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

***Work / Experience Summary: (Starting from current / most recent)***

| ***Sr. No.*** | ***From (DD/MM/YY)*** | ***To (DD/(MM/YY)*** | ***Organization*** | ***Type of organization (Govt. /Semi Govt. Private/Ngo)*** | ***Designation*** | ***Responsibilities (Min. 30 and Max. 50 Words)*** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| ***Total Experience (In Years & Months):*** | | | | | ***Relevant Experience to the post applied (In Years & Months):*** | |
| | | | | | ***Notice Period/Joining Time (Days):*** | |

**Details of Internship / Workshops/Conferences/Trainings Attended (If any):**

***Declaration:***

*I hereby declare that all statements made in the application are true, complete and correct to the best of my knowledge and belief. I understand that in the event of any information being found untrue/false/incorrect or I do not satisfy the eligibility criteria my candidature will be cancelled, without assigning any reason thereof. I have read the content of the advertisement and agree to abide by the rules, regulations and procedures for appointment to the post applied for.*

Name:

Place:

Date : **Signature**

**Disclaimer:**

**The applicants are required to submit the duly filled application on or before the due date and time, failing which the application of the said applicant shall be treated as non-responsive. NHM Raigad shall not be responsible for late receipt or non-receipt of application/ s for any technical reason or whatsoever. The applications received after due date and time shall not be considered.**